# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक बांधकाम विभाग,
## कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग,
## सातारा

## नागरिकांची सनद 2024

# सूची


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावना | 3 |
| 2 | कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, सातारा या कार्यालयाची बांधीलकी व नागरीकांची जबाबदारी. | 4 |
| 3 | विभागीय कार्यालयाची रचना. | 4 ते 5 |
| 4 | मुख्यालय दर्शविणारा तक्ता. | 5 |
| 5 | कार्यपूर्तीचे वेळापत्रक | 6 |
| 6 | जनतेच्या गाऱ्हाण्यांचे निराकरण व सनदीचा आढावा. | 7 |
| 7 | जनसामान्याकडून सूचना व नागरीकांच्या सनदेची अंमलबजावणी. | 7 |
| 8. | माहितीच्या अधिकार अधिनियम -2005 प्रकरणे | 8 |
| 9. | मुख्यालय दर्शवणारा वृक्ष तक्ता (Tree Chart) | 9 |

## प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागास गौरवशाली परंपरा आहे. या सा.बां.विभागांतर्गत पुणे प्रादेशिक विभागाच्या कार्यक्षेत्रात अधीक्षक अभियंता, साबां. मंडळ सातारा अंतर्गत मार्ग प्रकल्प विभाग, सातारा हे कार्यालय सन 1983 पासून कार्यरत आहे. सातारा शहरामधील बांधकाम भवन येथे पहिल्या मजल्यावर या विभागाचे मुख्यालय आहे. सार्वजनिक बांधकाम मंडळाअंतर्गत नव्याने प्रस्तावित करण्यात येणाऱ्या रस्ते, पूल, व इमारतीचे सर्व्हेक्षण करणे, तसेच अंदाजपत्रके बनवणे, ही कामे मार्ग प्रकल्प विभागामार्फत करण्यात येतात. या विभागा अंतर्गत 2 उपविभाग कराड, फलटण असे कार्यरत आहेत.

नागरिकांचे सार्वजनिक बांधकाम विभागांशी संबंधीत प्रश्न तत्परतेने, सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक सोडविण्यासाठी मार्ग प्रकल्प विभाग कटीबध्द आहे. ही बांधीलकी या सनदेद्वारे जाहीर करण्यात येत आहे. नागरिकांचे प्रश्न सहानुभूतीपूर्वक दृष्टीकोन ठेवून नागरीकासाठी ही सनद तयार करण्यांत येत आहे.

1) नव्याने प्रस्तावित रस्ते, इमारती व पूलांचे अहवाल वरीष्ठांच्या सूचनेनुसार व मार्गदर्शनानुसार तयार करणे.

2) नव्याने प्रस्तावित करणेत येणाऱ्या रस्ते, पूल व इमारती व अतीवृष्टीमुळे बुडीत पूलांची उंची वाढवणेसाठी प्रस्तावाबाबत सविस्तर सर्व्हेक्षण करुन अंदाजपत्रक बनविणे.

3) सर्व्हेक्षण झाल्यानंतर अंदाजपत्रक बनविताना प्रकल्प तांत्रिकदृष्टया परीपूर्ण तसेच काटकसरीचा व जास्तीत जास्त लोकांना उपयुक्त होईल याची दक्षता घेणे.

4) विभागीय कार्यालयातील सर्व कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या फलकावर जाहीररीत्या प्रदर्शन करणे.

5) **"माहितीचा अधिकार अधिनियम"** अंतर्गत या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारितील माहिती संबंधितांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणे.

6) कार्यालयाच्या कामकाजात सातत्याने तत्परता ठेवून व आधुनिकता आणून या विभागाची तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.

7) विभागीय कार्यालय तसेच विभागांतर्गत 2 उपविभाग संगणकीकृत करुन तातडीची माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

8) विभागांतर्गत अद्यावत माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करणे.

9) नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

**2) मार्ग प्रकल्प विभाग, सातारा या कार्यालयाची बांधीलकी व नागरिकांची जबाबदारी**

*** मार्ग प्रकल्प विभाग, सातारा कार्यालयाची बांधिलकी -**

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना मार्ग प्रकल्प विभाग, सातारा.

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

ब) सौजन्यपुर्ण व मदतीची भावना ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) कार्यप्रणालीमध्ये पारदर्शकता व निष्ठा ठेवील.

*** नागरिकांची जबाबदारी -**

1. शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौहार्दपूर्ण, सहकार्याची व सौजन्यपूर्वक असावी.
2. नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावीत.
3. नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.
4. शासनाने विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.
5. सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.
6. नागरिकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करू नयेत.
7. कृपया नागरिकांनी कायदेशीर तरतुदी, नियम, अलिखीत संकेत यांचे पालन करावे.

**3) कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, सातारा कार्यालयाची रचना.**

कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, सातारा या कार्यालयाची शासनाने सातारा या मुख्यालयाचे ठिकाणी दिनांक 16/06/1983 रोजी स्थापना केली आहे. कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, सातारा अंतर्गत उप अभियंता, मा. प्र. उपविभाग, कराड, उप अभियंता व मा. प्र. उपविभाग, फलटण व उपअभियंता, मा. अशी एकूण दोन उपविभागीय कार्यालये आहेत.

विभागीय कार्यालयात प्रकल्प शाखा/रेखा शाखा/लेखा शाखा/भांडार शाखा आस्थापना शाखा अशी शाखावार विभागणी केली आहे.

**<u>या शाखांचे प्रमुख अधिकारी/कर्मचारी खालीलप्रमाणे आहेत.</u>**

| अ.क्र. | शाखा | प्रमुख अधिकारी | अधिकारी/कर्मचारी |
|---|---|---|---|
| 1. | प्रकल्प शाखा | उप कार्यकारी अभियंता | शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-2/कनिष्ठ अभियंता (प्रकल्प अभियंता) |
| 2. | रेखा शाखा | आरेखक | सहाय्यक आरेखक/अनुरेखक |
| 3. | लेखा शाखा | विभागीय लेखाधिकारी | वरिष्ठ लिपीक/कनिष्ठ लिपीक |
| 4. | आस्थापना शाखा | प्रथम लिपीक | वरिष्ठ लिपीक/कनिष्ठ लिपीक |
| 5. | भांडार शाखा | भांडारपाल | सहाय्यक भांडारपाल/कनिष्ठ लिपीक |

सातारा जिल्ह्यातील पुढे नमुद केल्याप्रमाणे तालुकानिहाय कार्यक्षेत्र उपविभागांच्या कार्यक्षेत्रामध्ये येते.

| अ.क्र. | उपविभागाचे नाव | तालुके. |
|---|---|---|
| 1 | उप अभियंता, मा. प्र. उपविभाग, कराड | कराड,पाटण,सातारा,कोरेगाव,जावली |
| 2 | उप अभियंता, मा. प्र. उपविभाग, फलटण | फलटण,खंडाळा,माण,खटाव,वाई,महाबळेश्वर |

कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, सातारा यांचे कार्यक्षेत्र सातारा जिल्हा आहे. विभागाअंतर्गत एकूण तीन उप अभियंता कार्यरत आहेत. तसेच उप कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालयात कार्यरत आहेत.

ह्या विभागाअंतर्गत कामांच्या अंमलबजावणीसाठी सा. बां. नियमावली, लेखा संहिता, वेळोवेळी निर्गमीत केलेली परिपत्रके इत्यादींचे काटेकोरपणे पालन क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून तसेच सर्व कर्मचाऱ्यांकडून केले जाते.

## मुख्यालये दर्शविणारा तक्ता (Chart)

| अ.क्र. | कार्यालय | मुख्यालय |
|---|---|---|
| 1. | कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग, सातारा | बांधकाम भवन, सदर बझार सातारा-415001 |
| 2. | उप अभियंता, मा. प्र. उपविभाग, कराड | रेस्ट हाऊस परिसर, शनिवार पेठ कराड-415110 |
| 3. | उप अभियंता, मा. प्र. उपविभाग, फलटण | अधिकारगृह बिल्डींग, प्रांत ऑफीस 3 रा मजला, फलटण 415523 |

**4) विभागाअंतर्गत कार्यपुर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता.**

**अ) कार्यपुर्तीचे वेळापत्रक.**

| अ.क्र. | कार्यसूची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी मर्यादा. |
|---|---|---|---|
| 1 | नव्याने प्रस्तावित करणेत आलेले रस्ते, इमारती व पूल यांचे सर्व्हेक्षण करणे. | कार्यकारी अभियंता तसेच उपअभियंता व शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता / स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक. | 60दिवस |
| 2 | माहिती अधिकारात मागणेत आलेली माहिती | शासकीय माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता | अर्ज प्राप्त झालेपासूनच 30 दिवसात |
| 3 | माहिती अधिकारांतर्गत प्राप्त अपिलिय अर्ज | अपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता | अर्ज प्राप्त झालेपासून 45 दिवसांत. |

**ब) माहितीची सुलभता.**

**सार्वजनिक** बांधकाम विभागाच्या www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी सादर केली जाणारी माहिती जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल.

**5) गाऱ्हाण्यांचे निराकरण सनदेचा आढावा व जनसामान्यांच्या सूचना.**

**अ) गाऱ्हाणी / तक्रारी यांचे निराकरण.**

कार्यपुर्तीस होणारा विलंब वा अन्य कांही गाऱ्हाणी विभागाअंतर्गत कामाबाबत काही तक्रारी असतील तर, त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणी /तक्रार असेल तर त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखाकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदाहरणार्थ- उपविभागीय कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणी /तक्रारी असल्यास विभाग कार्यालय प्रमुखांकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गा-हाणे मांडावे तक्रार नोंदवावी. अशा गाऱ्हाणी /तक्रारींचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून 7 दिवसात करण्यांत येईल. गाऱ्हाणी / तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र तक्रार पेटी ठेवण्यांत येत आहे. गाऱ्हाणी समक्ष भेटीत / पत्राने अथवा ई - मेलव्दारेही नागरिक मांडू शकतात.

**ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन.**

या विभागाच्या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा मार्ग प्रकल्प विभाग, सातारा अंतर्गत घेण्यांत येईल व त्याचा अहवाल प्रसिध्द करण्यात येईल.

**क) जनसामान्याकडून सूचना.**

या विभागाची नागरीकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरीकांच्या बहुमुल्य सूचनांचा गांभिर्यपुर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वत:हून कांही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

**ड) नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी.**

मार्ग प्रकल्प विभागांतर्गत नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यांस विभागीय कार्यालय कटिबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया/अभिप्राय मागविण्यांत येतील व त्यांच्या सुचनांचा यथोचीत आदर करुन आवश्यक बदल करण्यांत येतील. मार्ग प्रकल्प विभाग, सातारा खात्रीपुर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. ह्या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील सौजन्यपुर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणुक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशिर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गाऱ्हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यांत येईल.

**<u>माहिती अधिकार अधिनियम -2005 प्रकरणे</u>**

अ) माहिती अधिकारात आलेले अर्ज हे विभागीय कार्यालयाशी संबंधित माहिती असेल तर संबंधित कर्मचा-यांकडील माहिती एकत्रित करून अर्जदारस 30 दिवसांचे आत माहितीबाबत, शुल्क भरण्यास कळविले जाते अथवा माहिती पाठविली जाते.

ब) माहिती अधिकारात आलेले अर्ज हे ब-याच वेळेस इतर प्राधिकरणाशी संबधित असल्यास माहिती अधिकार-अधिनियम-2005 अंतर्गत कलम (3) खाली 5 दिवसांचे आत वर्ग करणेत येतो.

क) माहिती अधिकारात आलेले अपील अर्जावर अपील सुनावणी ही तीस दिवसाचे आत घेवून निर्णय दिला जातो. रेखा शाखेतील संबंधित कामाच्या कार्यपुर्तीचे वेळापत्रक परिशिष्ट 'क' मध्ये नमूद केले आहे.

**नागरिकांच्या सुचना स्वागतार्ह आहेत.**

**वरील मजकूर कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, सातारा 415001 यांनी प्रसिध्द केला.**

**कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, सातारा (विभागीय कार्यालय)**

**उप कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, सातारा (विभागीय कार्यालय)**

- प्रकल्प शाखा
- रेखाचित्र शाखा
- उप विभागीय कार्यालये
  - उप अभियंता, मार्ग प्रकल्प उपविभाग, कराड
  - उप अभियंता, मार्ग प्रकल्प उपविभाग, फलटण
- भांडार शाखा
- लेखा शाखा
- प्रशासन शाखा